# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 18/08/2020 (मंगळवार)

(सायंकाळ)

---

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

1) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील रायसोनी कॉलेज जवळ खापरखेडा वार्ड क्र. 1 चिचोली येथे दिनांक 17/08/2020 चे 19.30 वा. ते 20.15 दरम्यान 17 वर्षीय विधीसंघर्ष बालकाची अंगझडती घेतली असता त्याने घातलेल्या टी शर्ट चे आतील भागात खोचलेले एक चाकु दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या बाळगुन मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस उपनिरीक्षक किरण शेवाळे, पोस्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे खापरखेडा येथे विधीसंघर्ष बालकाविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून त्यास ताब्यात घेण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक नितेश पिपरोदे 9921711955 हे करीत आहेत.

2) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत नाका क्र. 7 कांद्री कन्हान येथे दिनांक 17/08/2020 चे 20.45 वा. ते 21.45 वा. दरम्यान आरोपी नामे– रूपेश राजु सहारे, वय 21 वर्ष, रा. कांद्री वार्ड क्र. 2 कन्हान याने स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात चाकु घेवुन गावात दहशत निर्माण करतांना मिळुन आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोशि सुधीर, पोस्टे. कनहान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपिविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा येसु जोसेफ 8275871504 हे करीत आहे.

### अकस्मात मृत्यु

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 8 कि. मी. अंतरावर पाटनसावंगी येथे फिर्यादीचा भाऊ नामे– विष्णु रमेशरावजी ठाकरे, वय 32 वर्ष, रा. वार्ड क 04 पाटनसावंगी हा दिनांक 14/08/2020 रोजी सकाळी 09.00 वा. सुमारास डयुटी वर जातो असे म्हणुन घरून निघाला गेला. तो सायंकाळी घरी परत न आल्याने त्याचा शोध गावात व इतर ठिकाणी घेतला असता मिळुन आला नाही. दरम्यान विष्णु ठाकरे याचे प्रेत दहेगाव येथील कोलार नदीच्या पात्रात मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विजय रमेशराव ठाकरे, वय 27 वर्ष, रा वार्ड क 04 पाटनसावंगी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास सफौ डाहाके 9823517412 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष<br>
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर